काय करायला हवे?

अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

जानेवारी २०१४

प्रस्तावना : नलिनीकांत गुप्त यांचे भाषण

काय करावयास हवे?

सृष्टी ही उत्क्रांतीच्या तिच्या चक्रांचे अनुसरण करीत असते आणि असे म्हणतात की प्रत्येक चक्राच्या अंताला 'प्रलय' घडून येत असतो - अस्तित्वात असलेल्या चेतनेच्या स्तराचा किंवा त्या चेतनेला मूर्तरूपात साकार करणाऱ्या प्रजातीतील जीवमात्रांचा संपूर्ण विनाश होतो आणि समग्र गतकाळ हा धुवून काढला जातो. सृष्टीच्या, सृष्ट जगताच्या पृष्ठ भागावरून पुसून टाकला जातो आणि विकासाच्या पुढच्या टप्प्याचा प्रारंभ होतो.

अशाच एका (विकास) चक्राची कहाणी आपल्या सर्वांना ठाऊक आहे, आपण त्याचे साक्षीदार आहोत असे म्हणणे अधिक योग्य ठरेल; माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे वर्तमान चक्र, आता ते भूतकाळात जमा झाले असले आणि एका अर्थी मृतप्राय झालेले आहे तरी, आपल्याला हे माहित आहे की आकाशीय द्रव्यातून (Ether) जडतत्व उत्क्रान्त झाले, निष्प्राण जडद्रव्यातून प्राणतत्व, आणि प्राणतत्वातून मन विकास पावले. आपल्याला हे जरी ठाऊक आहे तरी प्राणविरहित जडातून (प्राण) जीवन उसळी मारून वर कसे आले किंवा मनविरहित प्राणामध्ये, म्हणजेच प्राण्यांमध्ये मन कसे प्रविष्ट झाले हे मात्र आम्हाला नेमके ठाऊक नाही. ह्याबाबत कितीतरी 'कसे' हे प्रश्न विचारता येतील त्याहूनही अधिक त्यांची संभाव्य व असंभाव्य उत्तरे देता येतील.

आपल्याला असे म्हणता येते, किंबहुना श्री अरविंद व श्री माताजींनीच आम्हाला हे सांगितले आहे की दोन प्रकारच्या प्रक्रिया घडल्या : एका बाजुस, अस्तित्वात असलेल्या चेतनेच्या अवस्थेत ह्यानंतर येणाऱ्या चेतनेच्या अवस्थेचे बीज अगदी प्रारंभापासून समाविष्ट झालेले होते; जणू ते सुप्तावस्थेत होते; आणि दुसऱ्या बाजुला वरून किंवा भोवतालून किंवा कोठूनतरी, त्याच प्रकट होऊं पाहणाऱ्या चेतनेचा झोत किंवा शक्ति वातावरणात अवतरित झाली, आणि तिच्या दाबामुळे ते सुप्त बीज जागृत झाले आणि वरून अवतरित होणाऱ्या त्याच्या प्रतिरूपाला भेटण्यासाठी वर चढूं लागले- आणि दोघांनी एकत्र येऊन विकासाच्या एका नवीन मार्गाचा प्रारंभ केला.

तर, अशा प्रकारे जडतत्वातून प्राण; आणि प्राणातून मन उत्क्रान्त झाले - आणि मनुष्याचा जन्म झाला. होय, आजतागायत पृथ्वीवर जी उत्क्रान्ति घडून आलेली आहे तिचे सर्वोच्च शिखरस्थान मनुष्यच भूषवित आहे. मनुष्यात मनाने किंवा मानसिक चेतनेने तिला शक्य असलेली सर्वोच्च उंची गाठलेली आहे. परंतु तरीशुध्दा मनुष्य हा संपूर्णतया मनोमय जीव (अस्तित्व) होऊं शकलेला नाही, तर तो एक मानसिक/मनोमय पशू आहे.

मन हे अद्यापर्यंत त्याच्या आधारांचे (मन, प्राण, शरीराचे) स्वामी झालेले नाही; मानसिक क्षमतेला जे नियंत्रित करते आणि संचालित करते ते प्राणतत्व हेच, त्याच्यातील पशु, त्याचे प्राणिक अस्तित्व हेच त्याचा खरा स्वामी होय, जे स्वत:, त्याला क्रियाशील होण्याची वेळ येते तेव्हा त्याच्यातल्या तमोग्रस्त पशुतुल्य तत्वाचा दास असल्याचे दिसते. म्हणून त्याच्यात बुध्दीची भव्यता असली तरीही मनुष्य हा एक धोकादायक जीव - धोकादायक, कारण त्याच्यातील प्राणिक (प्राणतत्व) हे त्याला, त्याच्या स्वत:च्या त्याचप्रमाणे त्याच्या भोवताली असणाऱ्या सर्वच गोष्टींना विनाशाप्रत घेऊन जात आहे. मनुष्य हा, निसर्गाचा/प्रकृतीचा एक विचित्र असा प्रयोग आहे.

म्हणून अद्‌यापपर्यंत झालेल्या उत्क्रान्तीतील वृध्दी किंवा प्रगती ही अधिकतर/महत्तर दुर्बोधतेतून अल्पतर दुर्बोधतेपर्यंत, महत्तर अज्ञानातून अल्पतर अज्ञानापर्यंत, महत्तर दु:खातून अल्पतर दु:खापर्यंत अशा प्रकारची होत राहिलेली आहे जरी अन्य कोणतीतरी शक्ति तिच्यापाठीमागे - अशी शक्ति जिचे सारतत्व हे आनंद आणि सचेतनता तसेच सत्‌चा भाव आहे - त्या शक्तीने ह्या प्रक्रियेला नेहमीच आधार दिलेला आणि तिचे पोषण केलेले आहे. वैभवशाली दीप्तिमानतेचे उजळून टाकणारे झोत, आनंद आणि सामंजस्याच्या भव्यतेचे स्फोट अल्प क्षणांसाठी का होईना होऊन गेलेले आहेत, भव्य शक्ति तसेच सर्जनशीतेचे महापूर आहेत; परंतु सर्व गोष्टी लक्षांत घेता सृजन किंवा निर्मिती किंवा अस्तित्वाचे, जीवनाचे एक रूप ह्या दृष्टीने विचार केला असता, ही निर्मिती परिपूर्ण पूर्णत्वापासून बरीच दूर, अनेक उणीवा असलेली अशी होती. मानवाला असे स्वप्नातही

वाटणार नाही की विकासाच्या मार्गावरील सर्वोच्च शिखरावर तो आहे. असे आहे तर, मग नंतर येणारी अवस्था कोणती असेल?

तर्कशुध्द विचार करता ह्यानंतरची पायरी म्हणजे, असेच काहीतरी असावयास हवे, जे मनाच्याही पलीकडचे असेल - ती एक अशी निर्मिती असेल जी अधिक उत्तम तसेच अधिक महान अशा कोणत्यातरी गोष्टीवर आधारलेली असेल. श्री अरविंदांनी आम्हला हे सांगितले की ते एक नूतन चक्र असेल. सत्याचा आधार आहे असे उत्कांतिचे ते एक नूतन चक्र असेल - सत्याची होणारी अभिवृध्दी असेल, सत्यापासून महत्तर सत्याप्रति, प्रकाशाकडून महत्तर प्रकाशाप्रति, आनंदाकडून महत्तर आनंदाप्रति केलेली ती प्रगती असेल.

प्रारंभी, श्री अरविंदांनी जिला 'अतिमानस' असे नाव दिलेले आहे त्या 'सत्य-चेतनेला' ऐहिक वातावरणात अवतरित करावे लागणार होते जणेकरून निर्मितीच्या अंतरात दडून बसलेल्या आंतरतम सत्याला जागृत करणे तिला शक्य होईल. आणि हे कार्य सिध्द करण्यासाठी श्रीअरविंद व श्री माताजी मानवी देह धारण करून ह्या पृथ्वीवर अवतरले, दोन गोलार्धांना जोडणारा सेतू ते बनले. त्यांच्या मानवी देहांमध्ये त्यांनी केवळ मानवतेचेच मानवी चेतनच्या सर्व मूलभूत तत्वांचे प्रतिनिधित्व केले नाही तर, संपूर्ण ईह-प्रकृती मानवी रूपात ज्याना अभिव्यक्त करू शकते त्या सर्व क्षमतांचे/संभाव्यतांचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. जी शक्ति वरून अवतरित होणार होती तिला पृथ्वी व मानवांच्या वतीने ग्रहण करण्यासाठी त्यांनी आपल्या देहांचा पात्र म्हणून उपयोग केला; त्यांनी त्या शक्तिला पृथ्वीतलावर अवतरित केले, इथल्या वातावरणात सुस्थिर केले आणि ते निघून गेले - कारण जे विशिष्ट कार्य पार पाडण्यासाठी त्यांनी भौतिक शरीर धारण केले होते ते पूर्ण झालेले होते.

होय, त्यांचे कार्य पूर्ण झाले आहे. आता, अवतरित झालेली नूतन चेतना सर्वत्र पसरेल आणि ती स्वतःच स्वतःसाठी स्थान बनवेल. ती 'सत्य-चेतना' आहे; तिच्या केवळ उपस्थितीनेच अज्ञान आणि असत्यता यांची लय बिघडणार हे नक्की, 'सत्य' - विरोधी रचनांची मोडतोड करून ती त्यांना उद्‌वस्त करून टाकेल आणि जे जे तिला आव्हान देईल व तिला

प्रतिकार करेल त्या सगळ्याला ती नष्ट करेल. हा परिणाम अटळ आहे.

श्री माताजी व श्री अरविंदांनी त्यांच्या अपार करूणेपोटी जी केवळ भगवंतच करू शकतो - आणखीही काही केले : असत्यावर होणारा 'सत्या'चा अंतिम अपरिहार्य परिणाम काय होणार हे त्यांना चांगलेच ठाऊक होते म्हणून अज्ञानग्रस्त बालकांना विनाशाच्या दुर्गतिपासून वाचवण्यासाठी, त्यांचे उत्थान करण्यासाठी त्यांनी आपले प्रेमाचे बाहू पसरले आणि हा आश्रय स्वीकारण्यास त्यांची अनुमती असेल तर 'सत्या'च्या पंखाखाली त्यांचे स्थान सुरक्षित केले. आणि मानवांच्या या दिव्य सेवाकार्यात त्यांचे मदतनीस होण्यासाठी, काही आले - फार जास्त नव्हेत - त्यांच्यासह पृथ्वीतलावर अवतरले.

श्री माताजी व श्री अरविंद यांनी आपली भौतिक शरीरे व उपस्थिती, मानवांनी चढून जाणे, आरोहण करावे म्हणून - नव्हे त्यांना वर उचलून नेण्यासाठी देऊं केलीत. ज्याप्रमाणे अळी आपल्या कोषाचा त्याग करून फुलपांखरू बनते त्याप्रमाणे मानवाने त्याच्या अज्ञानग्रस्त मानवी चेतनेचा त्याग करून आध्यात्मिक चेतना प्राप्त करून 'अतिमानव' व्हावे असे त्यांना वाटत होते परंतु अरेरे! मानव अपयशी ठरला. कदाचित ही नूतन नियती त्याच्यासाठी जास्तच नवी होती, अंधःकाराची सवय झालेल्या त्याच्या दृष्टीसाठी हा प्रकाश डोळे दिपवून टाकणारा होता; कदाचित ह्यामागे दैवाच्या अधिक सखोल गरजा आणि गुप्त कारणे असूं शकतील. परंतु मानव अपयशी ठरला, मानवाने ही मदत नाकारली आणि तो तिच्याविरूद्ध बंड करून उठला; प्राचीन लोककथांमधील असुरासमान, मनुष्याने ह्या नूतन चेतनेचा उपयोग त्याच्या मानवी हेतूंची पूर्तताकरण्यासाठी केला; त्याच्यातील मानवी अंशाने, 'स्व' ने 'दिव्य' सत्याच्या आदेशाचे पालन करण्याचे नाकराले. म्हणून मनुष्याने ही देऊं केलेली भेट स्वीकारली नाही.

काळ निघून गेला. श्री अरविंद व श्री माताजींनी आपल्या देहांचा परित्याग केला; परंतु त्यांनी पृथ्वीला मात्र त्यागले नाही. त्यांची उपस्थिती अजूनही येथे आहे, आम्हा सर्वांना आधार देते आहे आणि आमचा सांभाळ करीत आहे. परंतु आम्हाला आधार ह्यासाठी देत आहे की आम्ही अजूनही

'सत्या'लाच घट्ट धरून ठेवावे, अजूनही सत्याचीच सेवा करावी. त्यांचे प्रेम आणि उपस्थिती आम्हाला अद्यापही वेढून आहे आणि आम्हाला आधार देते आहे. आणि ते जे जे करीत आहेत ते सर्व आमच्या कल्याणासाठीच आहे, आमच्या आत्म्याच्या रक्षणार्थ करीत आहेत. जे जे आत्म्यासाठी जगत आहेत त्यांना नेहमीप्रमाणेच मातेचे बाहू उचलून पुढे घेऊन जात आहेत.

परंतु तरीही हे वेगळे आहे.

आपण 'प्रलया'बद्दल बोललो; तुम्ही भोवताली नीट पाहिलेत तर त्याला प्रारंभ झाला आहे अशी तुमची खात्रीच होईल. नूतन चेतनेच्या कार्यास प्रारंभ झालेला आहे आणि भाकीत केल्याप्रमाणे, तिच्या परिणामाच्या पहिल्या टप्प्यातच हे दिसून येते आहे की तिच्या आगमनाच्या मार्गात जे जे अडथळा बनते आहे त्या सर्वांचा संपूर्ण विनाश होतो आहे. **संपूर्ण जगच संकटात पडल्यासारखे दिसते आहे** - प्रस्थापित झालेले जीवनाचे प्रमाणित नमुने (Norms) कोसळतांना दिसत आहेत, **असत्यता आणि भ्रष्टाचार आमच्या अस्तित्वालाच पोखरून टाकीत आहेत, आसुरी उद्दीष्टें आणि वासनांनी माणसाचा ताबा घेतलेला आहे व तेच त्याचे नेतृत्व करीत आहेत, समग्र पृथ्वीला सर्वनाशाप्रत घेऊन जात आहेत.**

मनुष्याच्या आत्म्याचे काय होते? **हा आत्मा आहे तरी काय? आत्मा हा दिव्य सूर्यांचा एक स्फुल्लिंग आहे. तो स्वत:च्या लाभासाठी खाली उतरून (ह्या जगात) येत नसतो तर, खालच्या अंध:काराची मुक्तता मूळच्या प्रकाशामध्ये करण्यासाठी येत असतो.** आत्मे अवतरतात, इथल्या अज्ञानाला व अचेतनतेला ते वसतिस्थान किंवा अंगावरच्या पायघोळ झग्याच्या रुपात स्वीकारतांत, जेवढे शक्य असेल तेवढे त्याला स्वच्छ करतात व उजळतात, आणि नंतर काही काळासाठी विश्रांती घेऊन पुनश्च ते कार्य हाती घेतात. 'प्रलयकाल' येतो तेव्हा ते त्यांच्या मूळ निवासस्थानी - चेतनेत परतून येतात. प्रेमाच्या विलक्षण घटनेतील हे एक अद्‌भूत रहस्य आहे. आज देखील, आत्मे विश्राम घेण्यास जातात; ते हरवत नाहीत. वर्तमान पृथ्वी जरी नष्ट झाली तरी हे आत्मे मातृ-चेतनेंत सुरक्षित राहतील आणि त्यांच्यासह कदाचित ऐहिक चेतनेचे

रूपांतरित झालेले व सचेतन झालेले भाग, अंशही-जे शुध्द आणि सुयोग्य बनवले गेले आहेत - तेही सुरक्षितपणे जतन केले जातील. म्हणजेच कार्य हे संपूर्णपणे संपलेले नाही; अद्यापही काहीतरी वाचवता येणे शक्य आहे.

एकदा प्रलय किंवा विनाश समाप्त झाला - की हे करायलाच हवे, ती एक अनिवार्य अशी गरज आहे - हा सगळा अवशेषांचा ढिगारा स्वच्छ केला जायलाच हवा. दोन्ही कामे सोबत-सोबतच होतील. एकदा रंगमंच मोकळा, स्वच्छ झाला, की नवी सृष्टि, नव्या कालचक्राचा प्रारंभ होईल. सज्ञतेचा हा गतिमार्ग अनुसरला जात असतांना, हे स्वभाविकच आहे की मानवी दृष्ट्या, माणसाचे व जगाचे बरेच नुकसान होणार हे नक्की आणि 'आश्रम' तर पृथ्वीचे जगाचे मर्मस्थान असल्यामूळे त्याचीही ह्यातून सुटका नाही. त्याचा फटका आश्रमालाही बसणार. उलट ह्या ठिकाणी (आश्रमात) कार्य अधिक तीव्रपणे जोरदार होईल. तर जे अटळ आहे ते आम्हाला स्वीकारावेच लागेल आणि नंतर काय घडेल याची प्रतीक्षा करायलाच हवी.

परंतु ही प्रतीक्षा, आम्ही आळशीपणे, खिन्नपणे, निराश होऊनच करायला हवी का? मुळीच नाही. जे अधिक श्रेयस्कर गोष्टीसाठी अभीप्सा करत आहेत ते अजूनही ह्या चळवळीत सहभागी होऊ शकतात, नूतन आगमनास साह्यभूत होण्यासाठी आणि सेवाकार्यासाठी स्वत:ला अर्पण करू शकतात. हे करणे माणसाला अजूनही शक्य आहे. कारण प्रत्येक व्यक्ति ही, समग्र इह-चेतनेच्या केंद्रीकरणातील एक बिंदू आहे; स्वत:च्या चेतनेमध्ये त्याने प्रगती केली, स्वत:चे उत्थान थोडे अधिक केले, चेतनेच्या अधिक उच्च पातळीपर्यंत येऊन पोहोचला तर ते नक्कीच फायद्याचे आहे, लाभदायक आहे. परंतु पूर्वीपेक्षा बरेच अधिक कष्ट घेऊन त्याला हे करावे लागेल; त्याच्यासाठी आता अधिक खडतर तपस्या त्याला करावी लागेल. कारण जोवर माताजी त्यांच्या भौतिक देहात होत्या, तोवर आमच्यासाठी सगळे सोपे, सुलभ करीत होत्या. परंतु ह्यापुढे तसे असणार नाही.

ज्यांची खरोखरीच आध्यात्मिक चेतना प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे, ज्यांना आध्यात्मिक पध्दतीने जीवन जगायचे आहे, ज्यांना

महत्तर ध्येयांना साध्य करण्यासाठी स्वत:ला खरोखरीच सज्ज करावयाचे आहे. त्यांनी गोष्टींकडे अधिक गंभीरपणे बघावयाची गरज आहे. त्यांच्यासाठी ही (असे करणे) एक साधनाच आहे, एक सच्चा प्रयास आहे, एक जाणीवपूर्वक केलेली तयारी आहे. त्यांनी मोठमोठ्या शब्दांना विसरावे हेच त्यांच्यासाठी अधिक श्रेयस्कर आहे - ते शब्द आहेत 'अतिमानस', 'अधिमानस', 'उच्चतर मन' इ. ह्यांच्याबाबत चर्चा करण्याचा, ह्यांच्याबद्दल बोलण्याचा अधिकार आम्हाला राहीलेला नाही. आमच्यासाठी ते आमच्या आवाक्याबाहेरच्या स्वप्नांसमान, सुंदर स्वप्नांसमान आहेत. त्यांच्यावर माताजींचा व श्री अरविंदांचा अधिकार आहे. स्वत: श्री अरविंदांनीच म्हटले आहे :

स्वप्ने माझी वेचली मी रूपेरी वातावरणातून
स्वर्णसंगातून आणि निळाईमधून
आणि गुंडाळून ठेवीत हळूवारपणे तिथेच त्यांना आलोय सोडून,
रत्नजडित माझ्या स्वप्नांमध्ये तूंच आलास सजून.

"देवाचे कष्ट"

ती स्वप्नें श्री अरविंदांनी माताजींसह विणली होती, आणि ती त्या दोघांनी स्वत:जवळ काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे जतन केलेली आहेत. ती स्वप्ने त्यांनी अधिमानसांत ठेवलेली आहेत; ते त्यांचे कार्य आहे, तो त्यांचा मामला आहे. आम्हाला त्याच्याशी काहीच देणे-घेणे नाही. त्या स्वप्नांना माताजींनी स्वत:च्या हृदयांत सामावून घेतले आहे; योग्य वेळ आल्यानंतर, त्यांची तालबध्दता साधली गेल्यावर ते साकार होतील.

होय, आपण त्याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. त्यापेक्षा आम्ही स्वत:कडे बघावे हे अधिक चांगले, प्रामाणिकपणे हे मान्य करायला हवे की आमच्या स्वभाव प्रकृतीने तसेच आमच्या चेतनेने (जाणिवेने), आमच्या जीवन-पध्दतीने आम्ही प्राणी, नव्हे पशू आहोत; चेतनेच्या शिडीच्या सर्वात खालच्या पायरीवर आम्ही आहोत. तेथूनच, तळापासूनच आम्ही आमच्या कार्यास प्रारंभ करावयास हवा. ही आत्यांतिक भौतिक, जड अशी चेतना आहे; माताजींच्या भौतिक देहाच्या अनुपस्थितीत आम्ही थेट दलदलीमध्ये, संस्कारविहीन अशा भौतिक अस्तित्वाच्या चिखलात बुडी

घेतली आहे. म्हणून शुध्दकरणाच्या कार्याला आम्ही त्या पातळीपासूनच प्रारंभ करावयास हवा, देहाशी एकरूप झालेल्या चेतनेपासून प्रारंभ करावयास हवा; देहाचे आणि प्राणिकाचे शुध्दीकरण करण्याचा प्रयत्न आम्ही करावयास हवा. मनाचे? होय तर, मनाचेही - मनाच्या उच्चतर स्तरांचे, सामान्य मनाच्या स्तराचे शुध्दीकरण हे आमच्यासाठी अति उच्च कोटीचे आहे. आपण त्यांचा विचार बऱ्याच नंतर केला तरी चालेल.

शुध्दीकरणाच्या पध्दतीबद्दल बोलायचे तर, आपण अगदी प्रारंभापासूनच सुरुवात करायला हवी. अगदी प्रारंभिक धडे, राजयोगा त सुचवल्याप्रमाणे, थेट शरीरापासूनच त्यांची सुरूवात व्हायला हवी. आमच्या देहाला आम्ही प्रशिक्षण द्यावयास हवे, आमच्या ह्या भौतिक अंगाला आम्ही सुशिक्षित करावयास हवे, त्याच्यात बदल घडवून आणावयास हवा, त्याला पुनश्च घडवावयास हवे; एखादे लहान मूल शिकते त्याप्रमाणे आम्ही शिकले पाहिजे : "भांडण करूं नये", "अपशब्द बोलूं नयेत", "चोरी करूं नये", "खोटे बोलूं नये" इत्यादी. आध्यात्मिक अनुशासनाच्या प्राचीन पध्दतींचा ह्या गोष्टी प्राथमिक व मूलभूत भाग होत्या. राजयोगामध्ये त्यांना 'यम' आणि 'नियम' (अहिंसा, अस्तेय इ.) असे म्हटले जाते. बुध्दधर्मियांनी देखील त्यांच्या आध्यात्मिक प्रशिक्षणाचा प्रारंभ ह्याच धड्यांनी केला होता; त्यांनी त्यांना 'पंचशील' असे नाव दिलेले आहे : सदाचरण (विनय) इ. अंग काढून घेणे, मागे येणे (प्रत्याहार), ध्यान, एकाग्रता ह्या सगळ्या गोष्टी बऱ्याच नंतर, बरीच प्रगती केल्यानंतर, उत्थान झाल्यावर आल्यात. 'समाधी' ची अवस्था तर त्याहूनही बरीच वरची होती. म्हणूनच, प्राचीन युगांमध्ये ह्याबाबत विशेष आग्रह धरला जात असे - तुम्हाला आध्यात्मिक जीवनाचा आंगिकार करावयाचा असेल तर, तुम्हाला वेदशास्त्राचे जरी अध्ययन करायचे असेल तर ते करण्याचा अधिकार तुम्ही प्रथम प्राप्त करून घ्यायला हवा - तुम्ही 'चित्तशुध्दी' केली पाहिजे आणि तुमच्या चेतनेला विशुध्द करावयास हवे.

माताजी देहात असतांना नेहमी म्हणत असत : "तुम्हाला ही प्राथमिक तपस्या करण्याची गरज नाही; माझ्या देहाच्या आधार घेऊन तुम्ही फक्त एक उंच झेप घ्या आणि वर चढा, स्वत:चे उत्थान करून

घ्या." माताजींनी त्यांचा देह एखाद्या स्प्रिंगबोर्ड (व्यायाम प्रकारात वर उडी घेण्यासाठी उपयुक्त अशी लवचिक फळी) प्रमाणे त्याचा उपयोग आम्ही करावा यासाठी देऊं केला जेणे करून त्यांचा उपयोग करून आम्हाला वर झेप/उडी घेता यावी. परंतु ह्याचा फायदा आम्ही करून घेतला नाही; आम्ही त्यावर केवळ उड्या मारीत राहीलो (वर न चढता). माताजींना आघात सोसावे लागले आणि आम्ही कोणतीही प्रगती न करता होतो तेथेच राहिलो, निदान कोणतीही उच्च स्थिती प्राप्त केली नाही.

परंतु जगताचा आरंभ झाला तेव्हापासून
नरकाने केलेला तिरस्कार आणि मानवी द्वेष
हेच आले माझ्या वाट्याला बक्षीस म्हणून.

"देवाचे कष्ट"

ह्यावेळी देखील त्या ह्यातून निसटूं शकल्या नाहीत. आमची उन्नति जवळजवळ नगण्यच होती - आमच्या उन्नयनांपेक्षा आमच्या पतनांचीच संख्या जास्त होती. आम्ही ती सुवर्ण-संधी गमावली आहे. म्हणून ज्यांना प्रगती करण्याची, खरोखरीच आंतरिक प्रगती करण्याची आणि आंतरिक विकास करण्याची तीव्र इच्छा आहे, त्यांनी प्रारंभिक अवस्थेपासूनच सुरूवात करायला हवी.

अर्थात्, असेही अनेक लोक आहेत ज्यांना मानसिक स्तरावरच राहण्याची व तेच जीवन जगण्याची इच्छा आहे; ह्यापेक्षा अधिक काही साध्य करण्याची त्यांची तयारी नाही किंवा पात्रताही नाही. त्यांच्या दृष्टीने बौध्दिक अनुमान किंवा तत्वज्ञानविषयक चिंतन हाच संभाव्य असा सर्वोच्च विकास आहे - तोच त्यांचा आदर्श व ध्येय आहे, त्यांची सर्वोच्च उपलब्धी आहे; त्यांच्यासाठी बौध्दिक चर्चांमध्ये गुंतलेले असणे उपयुक्त असणे शक्यही आहे. अशा प्रकारे, बुध्दीच्या साह्याने ते मनामध्ये एक प्रकारचे ऐहिक बुध्दीगम्य वातावरण, आध्यात्मिक प्रतिकृती निर्माण करूं शकतात : ते ही चांगलेच आहे. बाह्य जगात, विशेषकरून युरोप आणि अमेरीकेत जेथे आधुनिक जीवनाचे व चेतनेचे केंद्रिकरण बुध्दीमत्तेवर झालेले आहे, जेथे बौध्दिक प्रकाश हाच एकमेव प्रकाश आहे, बुध्दि ही जीवनाचा अद्वितीय स्वामी मानली जाते, त्यांचे ठीक आहे, त्यांना चर्चा करू द्यावी

आणि तर्क करले जाते; त्यामुळे त्यांना विकास थोडे मानसिक ज्ञान, बुध्दीची शुध्दता आणि सूक्ष्मता येईल.

परंतु जे लोक केवळ त्यांच्या मनाला सुशिक्षित आणि सक्षम बनवण्याची अपेक्षा करीत नाहीत, तर त्यांच्या चेतनेला अग्रत आणि रूपांतरित करून इच्छितात आज त्यांनी तपस्या करण्याची आवश्यकता आहे, त्यांच्या समग्र शक्तिला व इच्छाशक्तिला त्या एकाच अभीप्सेवर तीव्रपणे एकाग्र करण्याची, ह्या एकाच कृष्कर, असाध्य प्रयासावर एकाग्र करण्याची गरज आहे. जी एकच गोष्ट करणे त्यांना आवश्यक आहे ती आहे आत्म-शुध्दीकरण-देहाचे शुध्दीकरण, प्राणाचे/प्राणिकाचे शुध्दीकरण, चेतनेच्या संपूर्ण कनिष्ठ पायाभूत आधारांच्या भौतिक आणि विशेषेकरून त्यांच्या कनिष्ठ प्राणिक/प्राणमय अंगांची पुनश्च स्थानलिप्सिती तसेच पुनर्रचना करणे. व्यावहारिक जीवनात ज्यांना आध्यात्मिकता आणावयाची आहे त्यांनी तत्पर्यंत जाऊन शुध्दीकरण साध्य करणे आवश्यक आहे.

आणि भावीकाल? कोणाचा भावी काल? व्यक्तिगत आत्म्याचा भावीकाल हा साधकांच्या हातात आहे. आणि सृष्टीचा भविष्यकाल एक नूतन दिव्य उषःकाल असेल; तो सज्ज आहेच, जड भौतिकात अभिव्यक्त होण्यासाठी पूर्णपणे तयार आहे; तो प्रतीक्षा करीत आहे, त्याचा उदय घेणार हे अटळ आहे, कोणतीच शक्ति त्याला अडवू शकत नाही. इंच-इंचभूमी मोकली होण्याची प्रतीक्षा करीत ती सूक्ष्म भौतिकात थांबलेली आहे. चिरंतन उषेचे जे स्वप्न युगानुयुगांपासून आमच्या पूर्वजांनी पाहिले, त्याचे स्तुतीगान गायले, ते प्रत्यक्षात साकारेल:

पहा, सर्वोच्च प्रकाशाच्या प्रकाशाचे आगमन झालेले आहे.

(ऋग्वेद १.११३.१)

*

पुढील पानांवर आम्ही, श्री अरविंद व श्रीमाताजी यांच्या भाषणांतून/लेखनातून शुध्दीकरणावर संकलित केलेले मार्गदर्शनपर विचार देत आहोत. - सं.

The path is long,

but self-surrender makes it short;

the way is difficult,

But perfect trust makes it easy.

Sri Aurobindo

With best compliments from:

CITRUS
Check Inns
HOLIDAY - ANY SEASON ANY REASON

CITRUS CHECK INNS LTD.

H.O.: 16-19 1ST Floor, Shilpin Centre, G. D. Ambedkar Marg, Wadala, Mumbai-400031. Tel.- 022 66191000, Fax: 02224174926
Email:enquiry@citruscheckinns.in www.citruscheckinns.in

Regd.office : 317, Parvati, Sunmill Compound, Lower Parel (W), Mumbai - 400014
Tel: 02240965600, Fax: 02240965601

Branches: Borivali, Thane, Kalyan, Vashi, Dahanu, Silvasa, Talesari, Pune, Rajgurunagar, Satara, Kolhapur, Kej Beed, Chiplun.